## निशाणी क्र.३४ वरील आदेश

प्रस्तुत अर्जाद्वारे वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६, नियम १७ प्रमाणे रेफरन्स अर्जामध्ये दुरुस्त करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

०२. अर्ज व अर्जास सामनेवाला क्र. ३ ने अर्जास दिलेले म्हणणे वाचले. सामनेवाला क्र. १ व २ ने अर्जास म्हणणे न दिल्याने त्याच्याविरुध्द अर्ज विना म्हणणे चालविण्यात आला.

०३. वादीतर्फे वकील श्री. नवाळे व सामनेवाला क्र. ३ तर्फे वकील वर्षा पाटील यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०४. अर्जदाराचे कथन की, त्यास अलिकडेच भुसंपादन अधिनियम कलम १२/२ ची नोटीस हाती लागली असता नुकसान भरपाईमध्ये त्यांना केवळ ७५ टक्के हिस्सा अभिप्रत असल्याचे स्पष्ट झाले. सदर परिस्थितीत मुळ रेफरन्स अर्जात तशी दुरुस्ती करणे आवश्यक झाले आहे. नुकसान भरपाईमध्ये अहमदखान इस्माइल देशमुख खान वगैरे इसमाचा २५ टक्के हिस्सा असल्याने त्यांना त्याबाबत वेगळा अर्ज दाखल करण्यास मोकळीक राहील, या हेतुने प्रस्तुतचा अर्जात दावा परिच्छेद क्र. अ,ब,क, प्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली. अर्जदारच्या कथनाप्रमाणे प्रस्तावित दुरुस्तीमुळे मुळ अर्जाचे स्वरुप बदलणार नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे गुंतागुंत टळणार आहे. सबब अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

०५. याउलट सामनेवाला क्र. ३ ने आवश्यक तो आदेश पारित करावा अशी विनंती केली.

०६. उभयपक्षांतर्फे करण्यात आलेला युक्तीवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुत रेफरन्सने अर्जदारने भुसंपादनाचा वाढीव मोबदला मागितला. अर्जातील कथने व मुळ अर्जाचे स्वरुप पाहता प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट रेफरन्स अर्जामध्ये प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास इतर सहहिस्सेदाराचे हक्क अबाधित रहाणार आहे. प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप पाहता दाव्याच्या मुळ रेफरन्स अर्जाच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. याउलट भविष्यात उद्भणारी गुंतागुंत टळणार आहे. चर्चील्या बाबींचा उहापोह करता, अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो असा निष्कर्ष नोंदवून खालील आदेश पारीत करण्यात

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदारांना मागणीप्रमाणे मुळ रेफरन्स अर्जामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–

महाड
दिनांक २२/१२/२०२३

(**पी. एम. उन्हाळे**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड